# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण) **P.S.(ठाणे):** करमाड
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0396 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**17/08/2026 21:28

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिंनाक पासून):** 17/08/2026
**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिंनाक पर्यंत):** 17/08/2026
**Time From (वेळेपासून):** 12:25 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:25 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 17/08/2026 **Time (वेळ):** 21:16 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 038
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 17/08/2026 21:16 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** करमाड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** करमाड
**District(State) (जिल्हा(राज्य)):** छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण)(महाराष्ट्र)

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अमोल पांडुरंग सोनवणे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, ,छत्रपती संभाजीनगर,करमाड,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, ,छत्रपती संभाजीनगर,करमाड,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9765555100

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री शिवाजी बाबासाहेब घुले | | | 1. करमाड,छत्रपती संभाजीनगर , करमाड,छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्रीमती रेणुका रामनाथ कुबेर | | | 1. हिवरा,छत्रपती संभाजीनगर , करमाड,छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 17/08/2026

मी अमोल पांडुरंग सोनवणे, वय 38 वर्ष, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर, मो.नं. 9765555100

मी वरील प्रमाणे असुन, दि.13/08/2026 रोजी मा.पोलीस अधीक्षक ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर यांनी आम्हास तक्रारदार श्री. शिवाजी भिमराव उकर्डे, वय 35 वर्ष, व्यवसाय शेती रा.करमाड ता.जि.छत्रपती संभाजीनगर यांचा मोबाईल नंबर-9175605681 हा दिला व त्यांच्या तक्रारी प्रमाणे पुढील कारवाई करण्याचे तोंडी आदेशीत केले. त्याप्रमाणे तक्रारदार यांचेशी संपर्क करुन त्यांची तक्रार दोन पंचासमक्ष ऐकुन घेतली व तक्रारदार यांनी त्यांचेकडे होत असलेल्या लाच मागणीची लेखी तक्रार दिली ती पुढील प्रमाणे-

मी वरील प्रमाणे असुन, माझी मुलगी ईशा शिवाजी उकर्डे वय 9 वर्ष हिला सन 2023 पासुन फिनीक्स इंग्लिश स्कुल, करमाड येथे आर टी ई अंतर्गत ऍ◌ॅडमीशन घेतले असल्याने माझे मुलीला शाळे कडुन कुठलही फिस लागु नसते फक्त वहया, पुस्तके, स्कुल बस तसेच शाळेच्या उपक्रमांची फीस ऐच्छीक असते. त्यासाठी शाळा आम्हाला बंधन करु शकत नाही.

आर टी ई अंतर्गत ऍ◌ॅडमीशन घेतलेल्या मुलांना शासकीय नियामा नुसार फि लागु नसताना देखील शाळेने पालकांना 2023 साली 2000/- रुपये 2024 साली 2000/- रुपये फिस आकारली ती सर्व पालकांसोबत मीही भरली. परंतू 2025 पासुन 4000/- रुपये फिस ठेवली. सदर फिस बेकायदेशिर मागत असल्याने मी मागील वर्षाची फिस दिली नाही. तसेच स्कुल बस ची सुविधा आम्ही घेतली असल्याने आम्ही स्कुल बस ची फिस नियमीतपणे भरत असतो, मागील वर्षाची स्कुलची बसची फिस 2500/- रुपये माझ्याकडे बाकी आहे.

मागील वर्षाच्या शाळेच्या फिससाठी मला वारंवार शाळेच्या मुख्यध्यापीका श्रीमती रेणुका कुबेर मॅडम यांनी कॉल करुन 4000 रुपये शाळेची फिस बाकी असुन, ती भरण्याबाबत तगादा लावता होता. त्या दरम्यान त्यांनी मला कधीही लेखी पत्र दिलेले नाही. दि.06/07/2026 रोजी मुख्यध्यापीका श्रीमती रेणुका कुबेर यांनी मला कॉल करुन मागील वर्षाची 4000/- रुपये व चालू वर्षाची 4000/- रुपये असे 8000/- हजार रुपये फिस बाकी असुन, ती भरुन घेण्याचे सांगितले. तसेच दि.11/08/2026 रोजी माझी मुलगी ईशा हीने शाळेतून घरी आल्यास सांगितले की, शाळेच्या संस्थाचालक शिवाजी घुले यांनी तिला शाळेत भेटुन मागील वर्षाची व चालू वर्षाची शाळेची फीस भरण्यासाठी वडीलांना सांगण्याबाबत निरोप दिला होता. त्यामुळे माझी मुलगी ईशा ही दि.12/08/2026 रोजी शाळेची फिस मी न भरल्यामुळे घाबरुन शाळेत जात नव्हती. परंतू मी तिला एक दोन दिवसात फि भरतो असे समजावुन शाळेत पाठविले.

फिनीक्स इंग्लिश स्कुल करमाड या शाळेच्या मुख्यध्यापीका श्रीमती रेणुका कुबेर व संस्थाचालक श्री. शिवाजी घुले हे माझ्याकडे मागत असलेली शाळेची फीस ही आर टी ई अंतर्गत ऍ◌ॅडमीशन घेतलेल्या मुलांना लागु नसून ते लाचेची मागणी करत आहेत, याबाबत माझी खात्री झाल्याने व त्यांना लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने मी पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे तक्रार देण्यासाठी संपर्क केला.

त्यानंतर त्या कार्यालयाचे पोलीस पथक पंचासह कुंबेफळ फाटयावर आले. त्यांचेकडे माझ्या वरील घटनेची लेखी तक्रार देत आहे. माझा संस्थाचालक शिवाजी घुले व मुख्यध्यापीका श्रीमती रेणुका कुबेर यांचेसोबत पैशाचा देण्याघेण्याचा व्यवहार नाही,वैर दुश्मनी नाही. मी यासोबत माझी मुलगी ईशा हीचे ऍ◌ॅडमीशनचे कागदपत्र झेरॉक्स देत आहे व मी आज रोजी संस्थाचालक शिवाजी घुले व मुख्यध्यापीका श्रीमती रेणुका कुबेर यांना माझ्या मुलीच्या

शाळेच्या फीसच्या मागणी संदर्भाने भेटण्यास जाणार आहे. तरी पुढील योग्य कायदेशीर कारवाई करावी हि विंनती आहे. अशा मजकुराची लेखी तक्रार दिली.
तक्रारदार यांनी दिलेल्या वरील तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारीतील अभिकथील लोकसेवक मुख्यध्यापीका श्रीमती रेणुका कुबेर व संस्थाचालक शिवाजी घुले यांची लाचमागणी पडताळणी करण्याचा निंणय घेण्यात आला. त्यावेळी आम्ही तक्रारदार, दोन्ही पंच, व सापळा पथकातील सदस्य यांना लाचमागणी पडताळणीच्या अनुषंगाने प्रक्रिया सांगुन, सुचना दिल्या. त्यानंतर दोन्ही पंचासमक्ष व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन, व्हाईस रेकॉर्डर चालू करुन तक्रारदार यांचे अंगावर लपवुन दिला. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 किरण साबळे यांना अभिकथीत लोकसेवक मुख्यध्यापीका श्रीमती रेणुका कुबेर व संस्थाचालक शिवाजी घुले यांच्या लाचमागणी पडताळणीसाठी फिनीक्स इंग्लीश स्कुल, करमाड येथे तक्रारदार यांचेकडील मोटार सायकलने दि.13/08/2026 रोजी 10.40 वा.सुरक्षित ठिकाणाहुन रवाना केले.
त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 हे लाचमागणी पडताळणीहून 11.15 वा.सुरक्षित ठिकाणी परत आले. त्यावेळी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला. व पंच क्र.1 साबळे यांना सुरक्षित ठिकाणाहुन गेल्यापासुन परत येई पर्यंत काय घडले याची विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, मुख्यध्यापीका कुबेर मॅडम यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांची मुलगी ईशा हीचे मागील वर्षाची शाळेची फीस 4,000/- रुपये व चालू वर्षाची फिस 4,000/- रुपये असे एकुण 8,000/- रुपये फिसची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांच्या मुलीचे ऍडमीशन हे आर टी ई अंतर्गत असल्याने फीस लागत नसल्याचे बोलले परंतू मुख्यध्यापीका मॅडम यांनी आर टी ई अंतर्गत ऍडमशन झालेल्या मुलांचे पैसे हे शासनाकडुन वेळेवर येत नाहीत, त्यामुळे मुलांचा खर्च परवडत नसल्याचे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यात कमी करण्याची विंनती केली परंतू त्यांनी अगोदरच फीस कमी आहे, त्यात काय कमी करणार असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांची ज्योती मॅडम यांचेशी भेट झाली त्यावेळी तक्रारदार यांनी बसचे पैसे किती बाकी आहेत असे विचारले तर त्यांनी चालू वर्षाची सहा हजार व मागील वर्षाची आडीच हजार बाकी असल्याचे सांगितले.
त्यानंतर संस्थाचालक शिवाजी घुले यांना तक्रारदार भेटले त्यावेळी त्यांनी तक्रारदार यांना आर टी ई मधुन शिक्षण घेणाऱ्या मुलांचे मागील तीन वर्षापासुनचे पैसे शासनाकडुन मिळालेले नाहीत. ते पैसे वेळेवर येत नसल्यामुळे शाळेला दररोजचा खर्च खूप आहे. आर टी ई चे पैसे मिळवण्याकरीता वकीलाला, शिक्षण विभागातील वरिष्ठ कार्यालयात परसेंन्टेज दयावे लागते असे सांगत, तक्रारदार यांना त्यांच्या मुलीची मागच्या वर्षीची बाकी असलेली फीस मागणी करुन, भरण्यास सांगितली. तसेच चालू वर्षाची फिस व बसची फिस नंतर भरण्यास सांगितले. त्यानंतर मी व तक्रारदार परत आलो असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांना विचारणा केली असता त्यांनी पंच क्र.1 यांचे प्रमाणे हकीकत सांगितली.
त्यानंतर तक्रारदार व दोन्ही पंच यांचे समक्ष लाचमागणी पडताळणीतील संभाषण ऐकले त्यात तक्रारदार यांना मुख्यध्यापीका श्रीमती रेणुका कुबेर यांनी तक्रारदार यांची मुलगी ईशा हिची मागील वर्षाची शालेय फिसचे 4,000/- रुपये व चालू वर्षाचे 4,000/- रुपये असे एकुण 8,000/- रुपये अशी फिसच्या नावाने लाचेची मागणी केल्याचे लाचमागणी संभाषणावरुन स्पष्ट झाले.
तसेच त्यानंतर संस्थाचालक शिवाजी घुले यांनी तक्रारदार यांना आर टी ई मधुन शिक्षण घेणाऱ्या मुलांचे शासनाकडुन पैसे वेळेवर येत नसल्यामुळे शाळेला दररोजचा खर्च खूप आहे. आर टी ई चे पैसे मिळवण्याकरीता वकीलाला, शिक्षण विभागातील वरिष्ठ कार्यालयात परसेंन्टेज दयावे लागते असे कारण सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यात कांही तरी कमी करा अशी विंनती केली. त्यावेळी संस्थाचालक शिवाजी घुले यांनी तक्रारदार यांना "हया वर्षीची राहू दया, काही अडचण नाही., पण मागचं क्लीयर करा" अशा प्रकारे तक्रारदार यांचेकडे मागच्या वर्षीची बाकी असलेली शालेय फीसच्या नावाने 4 हजार रुपये लाचेची मागणी करुन, शालेय फिसच्या नावाने पैसे देण्यास सांगितले. तसेच चालू वर्षाची फिस व बसची फिस नंतर भरण्यास सांगुन, लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. लाचमागणीतील तक्रारदार व संस्थाचालक शिवाजी घुले व मुख्यध्यापीका रेणुका कुबेर यांचेतील संभाषणाची स्क्रिप्ट काढुन, पंचासमक्ष सविस्तर लाचमागणी पंचनामा तयार करण्यात आलेला आहे. त्यानंतर तक्रारदार यांचेकडे लाचेची रक्कम देण्यास 4 हजार रुपये त्यावेळी उपलब्ध नव्हते म्हणुन तक्रारदार यांनी दोन-तीन दिवसात पैशाची जमवा जमव करुन, दि.17/08/2026 रोजी पुढील सापळा कारवाई करण्याची विंनती केली त्यावरुन सर्वानुमते दि. 17/08/2026 रोजी पुढील सापळा कारवाई करण्याचे ठरले.
त्यानंतर दि.17/08/2026 रोजी नियोजीत केलेल्या सापळा कारवाईत पंचासमक्ष तक्रारदार यांनी संस्थाचालक शिवाजी बाबासाहेब घुले, यांची भेट घेतली व त्यांच्या मुलीची मागच्या वर्षीची फिस चार हजार रुपये भरतो त्यात कांही कमी करा अशी विंनती केली परंतू शिवाजी घुले यांनी "मागच्या वर्षीची फिस आहे त्यात कमी कशी होईल बर"

असे बोलुन आज किती भरताय अशी विचारणा केली तेंव्हा तक्रारदार यांनी आता चार हजार भरतो मागची असे बोलले तेंव्हा त्यांनी चार आणि ती बसची आडीच एवढे भरुन टाकायची असती असे बोलले त्यावेळी तक्रारदार यांनी आता नाही दोन तीन दिवसात भरुन टाकतो असे सांगितले. त्यावेळी पंचासमक्ष लाचेची रक्कम फिनीक्स इंग्लिश स्कुल ऍ◌न्ड ज्युनियर कॉलेज, करमाड ता.जि.छत्रपती संभाजीनगर मधील शिवाजी घुले यांचे कक्षात स्वत: स्विकारले. त्यानंतर तक्रारदार यांनी लाच स्विकारल्याचा पुर्व नियोजीत इशारा केला. त्यावेळी आम्ही व सापळा टीम तात्काळ घटनास्थळी हजर झालो. त्यावेळी मुख्यध्यापीका रेणुका कुबेर शिवाजी घुले यांच्या कक्षाच्या बाजुच्या कक्षात हजर होत्या. शिवाजी घुले व रेणुका कुबेर यांना आमचा परिचय दिला व तक्रारदार यांचेकडुन स्विकारलेल्या लाचेच्या रकमेबाबत संस्थाचालक शिवाजी घुले यांना विचारणा केली असता, त्यांनी त्यांचे समोरील टेबलच्या उजवे बाजुचे वरचे ड्रॉवर मध्ये ठेवली असल्याचे सांगितले त्यावेळी दोन्ही पंचासमक्ष सदरची लाचेची रक्कम ताब्यात घेऊन पुढील कार्यवाही करुन त्याबाबत सविस्तर घटनास्थळ पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी लोकसेवक मुख्यध्यापीका श्रीमती रेणुका रामनाथ कुबेर व संस्थाचालक श्री. शिवाजी बाबासाहेब घुले यांनी त्यांचे फिनीक्स इंग्लीश स्कुल ऍ◌न्ड ज्युनियर कॉलेज, करमाड शाळेत तक्रारदार शिवाजी भिमराव उकर्डे, यांची मुलगी ईशा शिवाजी उकर्डे हिचे आर टी ई (शिक्षणाचा अधिकार कायदा 2009) या केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या योजने अंतर्गत शिक्षण घेत असताना तक्रारदार यांचेकडे मागील शैक्षणिक वर्षाची 4,000/- रुपये व चालू शैक्षणिक वर्षाची 4,000/- रुपये असे एकुण 8,000/- रुपये शालेय फीस घेण्याचा अधिकार नसताना तक्रारदार यांचेकडे बेकायदेशीरपणे शालेय फिसच्या नावाने लाचेची मागणी करुन, त्यात तडजोडीअंती मागील वर्षाची 4,000/- रुपये लाच रक्कम संस्थाचालक शिवाजी बाबासाहेब घुले यांनी दि.17/08/2026 रोजी 12.25 वा. फिनीक्स इंग्लीश स्कुल ऍ◌न्ड ज्युनियर कॉलेज मधील शिवाजी घुले यांचे कक्षात पंचासमक्ष स्वत: स्विकारली, म्हणुन माझी लोकसेवक मुख्यध्यापीक 1) संस्थाचालक श्री शिवाजी बाबासाहेब घुले व 2) श्रीमती रेणुका रामनाथ कुबेर यांचे विरुध्द कलम- 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम- 1988 प्रमाणे स.त.कायदेशीर फिंयाद आहे.

फिंयाद दिली सही.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Samratsing Vijaysing Rajaput(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**No.**(क्र.):

**Rank** (पद):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Samratsing Vijaysin
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI